**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2021 = 7.380, www.srjis.com*
*UGC Approved Sr. No.49366, NOV-DEC, 2022, VOL- 10/74*

# अनुदिनी लेखन :अभिव्यक्तीचे प्रभावी माध्यम

**डॉ. अपर्णा राहूल उकले**
*सहयोगी प्राध्यापक, ज्ञानगंगा कॉलेज ऑफ एज्युकेशन, पुणे-51*

**Paper Received On:** 20 November 2022
**Peer Reviewed On:** 10 December 2022
**Published On:** 01 January 2023

**प्रस्तावना :**

व्यक्ती आपले विचार व्यक्त करण्यासाठी विविध भाषेचा उपयोग करतो. तसेच तो विविध माध्यमांचा वापर करून तो लेखन करत आहे. पूर्वीच्या काळी आपले विचार व्यक्त करण्यासाठी व्यक्ती दैनंदिनी लिहीत असे. तसेच इतरांपर्यंत आपला संदेश पोहोचविण्यासाठी पत्रलेखन किंवा फोन द्वारे संदेश पाठवत असे. तसेच व्यक्ती त्याच्या आयुष्यातील घडलेल्या गोष्टींची नोंद दैनंदिनी मध्ये लेखन करून ठेवत असे त्यास डायरी लेखन असे म्हटले जात असे. डायरी मध्ये केलेले लेखन व्यक्तिगत स्वरूपात जतन करून ठेवली जात असे. एक प्रकारे ते एक अभिव्यक्तीचे माध्यमच होते. कारण आपल्या मनातले विचार भावना दुसऱ्यांबद्दल चे मत हे सर्व त्या डायरीमध्ये लिहून ठेवले जात असत. परंतु सध्या विज्ञान आणि तंत्रज्ञान केलेल्या प्रगतीमुळे आज आपण विविध प्रसार माध्यमांचा वापर करत आहोत. विविध वृत्तपत्रे, साप्ताहिके, नियतकालिके, ग्रंथ, पुस्तके तसेच दूरदर्शन, रेडिओ इत्यादी माध्यमातून आपण आपले विचार व्यक्त करत असतो. कारण एकविसाव्या शतकामध्ये विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा विकास फार वेगाने झालेला आहे. त्यामुळे प्रसारमाध्यमांचाही विस्तार झालेला आहे. विविध क्षेत्रांमध्ये आपण ही प्रसार माध्यमे फार मोठ्या प्रमाणात वापरत आहोत. ही प्रसार माध्यमे ज्ञानसंपादनाचे मार्ग न बनता इतरांना संपर्क करण्याचे मार्गही बनलेले आहेत. सध्या आपण इंटरनेट द्वारे जगभरामध्ये विविध माध्यमातून पोहोचत आहोत. त्यामध्ये व्हाट्सअप, इंस्टाग्राम, फेसबुक, twitter इत्यादींचा उगम झाला तसेच यामध्ये अनुदिनी लेखन किंवा ब्लॉग राइटिंग हे एक सामाजिक माध्यम उदयास आले. त्याद्वारे आपण आपले विचार दुसऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करत आहोत. आज प्रत्येक क्षेत्रातील व्यक्ती आपल्याला असलेले ज्ञान अनुदिनी लेखनाद्वारे जगभरामध्ये पोचविण्याचा प्रयत्न करत आहेत. म्हणूनच अनुदिनी लेखनाला खूप महत्त्व प्राप्त झालेले आहे. अनुदिनीचा उदय होण्यापूर्वी डायरी लेखन केले जात होते. व्यक्ती त्याच्या आयुष्यातील विविध घडामोडी ची नोंद डायरीमध्ये करून ठेवत असे. ते डायरी लेखन ही त्याच्या पुरतीच मर्यादित होते. परंतु आपले लिहिलेले विचार हे दुसऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी अनुदिनी लेखनाची गरज वाटू लागली म्हणून अनुदिनीची निर्मिती झाली. मनात आलेले विचार व भावना यांना अभिव्यक्त होण्यासाठी अनुदिनी हे उत्तम माध्यम आहे असे म्हणावे लागेल. व्यक्ती विविध विषयांचे अनुदिनी लेखन करत आहेत. प्रत्येक विषयावर आधारित व्यक्ती अनुदिनी लेखन करत आहे., त्यामध्ये शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय, व्यावसायिक, पर्यटन, चित्रकला, मनोरंजन इत्यादी क्षेत्रांचा समावेश

Copyright © 2023, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

आहे. कधी कधी एखाद्या कार्यक्रमावरती लेख लिहीत आहेत, तर कधी छायाचित्र, कधी एखादी पाककृती, अशा अनेक क्षेत्रांमध्ये अनुदिन्याचे लेखन केले जात आहे व त्याचा लाभ सर्व जगभरातील लोकांना होत आहे.

➢ **अनुदिनी लेखनाची संकल्पना :**

'ब्लॉग' हे वेबलॉग या शब्दाचे लघुरूप आहे. Web म्हणजे आंतरजाल आणि Log म्हणजे नोंद होय. वेबसाईट आणि लॉक बुक यांचे मिश्रण म्हणजे ब्लॉग असून ते अनुदिनी लेखनाचे इलेक्ट्रॉनिक रूप आहे. विविध विषयांवरील आपले व्यक्तिगत विचार समाजाला कळावे या उद्देशाने व्यक्तीने निर्माण केले संकेतस्थळ म्हणजे ब्लॉग अशी ब्लॉग ची व्याख्या करता येईल.

ब्लॉग म्हणजे आपले विचार इंटरनेट द्वारे प्रसारित करणे होय. तसेच आपली लेखन कला अवगत करून ते जगासमोर सादर करणे म्हणजे ब्लॉग लेखन होय. थोडक्यात आपण जे लिखाण केलेले आहे त्याला डिजिटल स्वरूप देणे होय.

संवाद साधण्याचे प्रभावी माध्यम म्हणून ब्लॉग लेखन करता येते. त्याद्वारे व्यक्ती आपले विचार भावना ज्ञान जगभरात पोहोचू शकते. जस्टिन हॉल हा आद्य ब्लॉगर म्हणून ओळखला जातो. 1994 मध्ये लिंक्स डॉट नेट ही वेब डायरी त्याने सुरू केली. सुरुवातीला हे मर्यादित स्वरूपात होते. परंतु दिवसेंदिवेश ब्लॉगचे लोकप्रियता वाढत असून ब्लॉक लेखन करणाऱ्यांची संख्या ही खूप मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे.

➢ **अनुदिनी लेखनाचे महत्व :**

1.व्यक्तीला आपले विचार व्यक्त करण्यासाठी, भावनांना मूर्त रूप देण्यासाठी, मनात येणारे विचार लिहिण्यासाठी अनुदिनी लेखन करणे महत्त्वाचे आहे.

2.व्यक्ती कधीकधी चित्रातून, कवितेतून व्यक्त होत असते. आपल्या सर्जनशील कौशल्याला वाव देत असते म्हणून ब्लॉक लेखन करणे महत्त्वाचे आहे.

3.आपल्याला आलेले अनुभव सार्वत्रिक करण्यासाठी लेखन करणे महत्त्वाचे आहे उदाहरणार्थ : आपण एखाद्या पर्यटन स्थळाला भेट दिली असता येथील अनुभव ब्लॉग लेखनाद्वारे व्यक्तींपर्यंत पोहोचविणे.

4. जगातील अनेक लोकांशी एकाच वेळी संपर्क साधण्यासाठी अनुदिनी लेखन करणे आवश्यक आहे.

5. विविध क्षेत्रातील लोकांनी केलेले संशोधन व त्याबद्दलची सविस्तर माहिती समजण्यासाठी, तज्ञांचे लेखन लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी, लोकांना मार्गदर्शन करण्यासाठी अनुदिनी लेखन महत्त्वाचे आहे.

6. लेखनकौशल्य विकसित करण्यासाठी व इतरांना लेखन करण्यास प्रोत्साहित करण्यासाठी अनुदिनी लेखन करणे महत्त्वाचे आहे.

7. विविध भाषेतील शब्द, संपत्ती व भाषिक कौशल्य यांच्यात विकास होणे व त्यामध्ये आवश्यकता सुधारणा होण्यासाठी अनुदिनी लेखन महत्त्वाचे आहे.

8. आंतरजालावरील तंत्रज्ञानाचा वापर करून विविध प्रकारचे लेखन करण्यासाठी व त्यांचा सराव करून घेण्यासाठी ब्लॉग लेखन करणे महत्त्वाचे आहे.

Copyright © 2023, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

अनुदिनी लेखन हे विविध क्षेत्रांमध्ये केले जाऊ शकते सुरुवातीला वैयक्तिक मर्यादेत असलेले डायरी लेखन हे आता सर्व जगभर पोहोचले आहे. विविध क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींना व्यक्ती लेखनातून व्यक्त होत आहेत. स्वतःबद्दलची कौशल्य सांगण्यापासून ते निवडणूक लढविण्यापर्यंत, वस्तूंची जाहिरात करण्यापासून ते विक्रीपर्यंत अशा विविध क्षेत्रांमध्ये अनुदिनी लेखन केले जात आहेत. वैयक्तिक, सामाजिक, व्यावसायिक, साहित्यिक, पर्यटन, शैक्षणिक, वैज्ञानिक, पर्यावरण इत्यादी क्षेत्रांमध्ये अनुदिनीचा वापर फार मोठ्या प्रमाणात केला जात आहे. ब्लॉक लेखनासाठी अनेक प्रकारचे व्यापक क्षेत्र उपलब्ध असली तरी प्रत्येकाने आपापल्या आवडीचे व आपल्याला ज्याच्यामध्ये नैपुण्यआहे, प्राविण्य आहे अशा क्षेत्रांची ब्लॉग लेखनासाठी निवड करता येईल. स्वतःला जो विषय आवडतो, आकर्षित करतो अशा विषयांमध्येच उत्स्फूर्तेने लेखन करणे आवश्यक आहे.

➢ **अनुदिनी लेखन करताना घ्यावयाची दक्षता :**

1. अनुदिनी लेखन करण्यापूर्वी प्रभावी सामाजिक माध्यम आहे म्हणून केले गेलेले लेखन हे गांभीर्याने केले जावे.
2. आपण ज्या विषयांवर लेखन करणार आहोत त्या विषयावरील अभ्यासपूर्ण लेखन करणे आवश्यक आहे.
3. लेखन करत असताना विचारपूर्वक व योग्य अशा शब्दांची निवड करावी. लेखनाविषयीची शिस्त व समाजभान राखून लेखन करावे.
4. अनुदिनी लेखन केल्यानंतर समाजातील व्यक्तींकडून त्यावर उलट सुलट प्रतिक्रिया येऊ शकतात. अशावेळी शांत डोक्याने प्रत्येक प्रतिक्रियांना उत्तर देणे आवश्यक आहे. तसेच लेखन करण्याची क्षमता लेखन करणाऱ्या मध्ये असणे आवश्यक आहे.
5. अनुदिनी लेखन करत असताना मिळालेल्या स्वातंत्र्याचा गैरफायदा न घेता योग्य शब्दात योग्य विषयावरती योग्य तेवढाच मजकूर लिहून आपले अनुदिनी लेखन करणे आवश्यक आहे.
6. लेखनामध्ये मर्यादित शब्द दर्जेदार व सकस लेखन होणे अपेक्षित आहे.
7. लेखनाला संशोधनाची जोड दिली असता उत्तम दर्जाचे लेखन लोकांपर्यंत पोहोचले जाऊ शकते.

➢ **अनुदिनी लेखनातील महत्त्वाचे घटक**

1. ब्लॉग (Blog) : ब्लॉग म्हणजे इंटरनेटवरील किंवा महाजालावरील नोंदवही होय.

2. ब्लॉगर (Blogger) : ब्लॉगर म्हणजे जी व्यक्ती अनुदिनी लेखन करते. म्हणजेच मजकूर लिहिणाऱ्या व्यक्तीस ब्लॉगर असे म्हणतात.

3. ब्लॉगिंग (Blogging) : म्हणजे मजकूर लिहिण्याची प्रक्रिया होय.

4. ब्लॉगो स्पिअर ( Blogosphere) : ज्या लोकांसाठी ब्लॉक लिहिलेला आहे असा वाचक वर्ग म्हणजे ब्लॉगो स्पिअर होय.

5. ब्लॉक टूल्स (Blog Tools) : ब्लॉक लिहिण्यासाठी आवश्यक असणारी साधने किंवा ब्लॉक तयार करण्याची साधने म्हणजे ब्लॉग टूल्स होय.

Copyright © 2023, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

6. ब्लॉग पोस्ट (Blog Post): ब्लॉक वरील लिखित नोंद म्हणजे ब्लॉग पोस्ट.

7. स्टेटस (Stetus) : स्टेटस वरून आपल्या ब्लॉगला जगभरातून किती लोकांनी भेट दिलेली आहे ती संख्या समजते.

8. कमेंट्स (Comments) : आपला ब्लॉग लोकांनी वाचल्यानंतर त्यावर दिलेल्या लोकांच्या प्रतिक्रिया आपल्याला या कमेंट्स मध्ये समजतात. या प्रतिक्रिया कधीकधी नकारात्मक तर कधीतरी सकारात्मक असतात. कधी कधी कौतुक करणाऱ्या असतात तर कधी कधी सुधारणात्मक स्वरूपाच्या असू शकतात.

9.कमाई(Earning) : ब्लॉग लेखन करणे हे एक आर्थिक उत्पन्नाचे साधन होऊ शकते. कारण आपला ब्लॉग वाचकांपर्यंत पोहोचू शकतो, तसा तसा आपल्याला विविध जाहिरातींच्या माध्यमातून आर्थिक उत्पन्न होण्यास सुरुवात होते.

10. पाने जोडणे (.Pages) : ग्रुपमध्ये आपण नवीन पेज प्रकाशित करू शकतो.

वरील घटकांशिवाय आपण [तर घटकांचा वापर करू शकतो. ब्लॉग अधिक आकर्षक करण्यासाठी विविध थीम सेटिंग वापरून आपण आपला ब्लॉग अधिक सुंदर करू शकतो.

- **ब्लॉग निर्मितीचे टप्पे :**

**Blogs** किंवा **websites** बनविण्यासाठी दोन चांगले **platform** आहेत. त्यांचे नाव आहे **wordpress** आणि **Blogger** या दोन **platform** वरून आपण **blog** बनवू शकतो. ते ही अगदी मोफत (**free**) मध्ये. **Google** वरील भारतातील निम्या पेक्षा जास्त **website** आणि **blogs** हे सर्वात जास्त **blogger** आणि **wordpress** वर बनविले जातात.

कोणताही ब्लॉग लेखन सुरू करण्यापूर्वी पुढील टप्प्यांचा वापर करणे आवश्यक आहे.

1. सर्वप्रथम ब्लॉक तयार करत असताना आपले स्वतःचेGoogle मध्ये Gmail Account असणे आवश्यक आहे. ते प्रथम उघडून घ्यावे.

2.Internet Explorer मध्ये www.blogger.com हे संकेतस्थळ उघडणे.

3.'Create your Blog' वर क्लिक करणे.

4. आपल्या Gmail: Google account ने पासवर्ड टाकून लॉगिन करा.

5. नवीन पेजवर शीर्षक(Title) द्यावे व आपला blogger address तयार करावा.

उदाहरणार्थ : aparna2003.blogpost.com

6. आपला ब्लॉगर एड्रेस तयार झाल्यानंतर आपल्या आवडीची योग्य ती थीम निवडावी.

7. शेवटी' CREATE BLOG' वर क्लिक करा.

अशा प्रकारे आपला स्वतःचा ब्लॉग तयार होईल. तुमचा **blog ready** झाल्य वर त्या वर **artical post** करत राहा आणि नवीन माहिती आपल्या **users** पर्यंत पोचवता येईल.

अशाप्रकारे आपण आपल्या आवडत्या विषयावरती ब्लॉग लेखन करू शकतो व लोकांपर्यंत आपली माहिती पोहोचू शकतो त्यातून आपली लेखन कला विकसित होईल. आपल्या आवडत्या क्षेत्रामध्ये आपण काम करू शकतो व त्यातून आर्थिक उत्पन्न मिळवण्यासाठी मदत होते.

**संदर्भसूची**

*https://marathitechcorner.in/how-to-start-blog-in-marathi/*

*https://totalmarathi99.blogspot.com/2020/10/how-to-start-blog-in-marathi-blogs.html*

*https://maharashtratimes.com/gadget-news/science-technology/how-to-write-a-blog/articleshow/68352552.cms*

*मराठी युवकभारती, ( इयत्ता अकरावी) पाठ्यपुस्तक (2019) महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे*

Copyright © 2023, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies